प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

मार्च 10, 2017

**बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 (एएसीएस) च्या कलम 35अ खाली दिलेले निदेश - दि भिलवाडा महिला अर्बन को ऑपरेटिव बँक लि. भिलवाडा (राजस्थान)**

जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येत आहे की, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 (एएसीएस) च्या कलम 56 सह वाचित, कलम 35अ च्या पोटकलम (1) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने (आरबीआय) दि भिलवाडा महिला अर्बन को.ऑपरेटिव बँक लि. ह्यांना काही सूचना/निदेश दिले आहेत. त्यानुसार, मार्च 9, 2017 रोजी व्यवहार बंद झाल्यापासून, वरील बँक आरबीआयकडून लेखी पूर्व-मंजुरी घेतल्याशिवाय, कोणतीही कर्जे किंवा अग्रिम राशी देणार नाही किंवा नूतनीकरणही करणार नाही, निधी उधार घेणे व नवीन ठेवी स्वीकारणे ह्यासह कोणतीही नवीन जबाबदारी स्वीकारणार नाही, तिची दायित्वे व वचने पूर्ण करण्यासाठी किंवा अन्यथा कोणतेही प्रदान करणार नाही किंवा प्रदान करण्यास राजी होणार नाही, कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा व्यवस्था ह्या मार्फत, तिच्या मालमत्ता किंवा ॲसेट्सची विक्री, हस्तांतरण किंवा आरबीआय निदेश दि. मार्च 7, 2017 मध्ये अधिसूचित केल्यानुसार सोडल्यास, अन्य प्रकारे वासलात लावू शकणार नाही. ह्याची एक प्रत, जनतेच्या माहितीसाठी वरील बँकेच्या कार्यालयात लावण्यात आली आहे. विशेषतः प्रत्येक बचत खाते, चालु खाते किंवा इतर कोणतेही ठेव खाते ह्यामधील एकूण शिल्लक रकमेमधून, रु.1,000/- (रुपये एक हजार) पर्यंतची रक्कम, (वरील आरबीआय निदेशांमध्ये दिलेल्या अटींवर) काढल्यास परवानगी दिली जावी.

वरील निदेश देण्यात आले असल्याचा अर्थ, आरबीआयने दिलेला बँकिंग परवाना रद्द करण्यात आला आहे असा घेतला जाऊ नये. वरील बँकेची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत, ती बँक, निर्बंधांसह बँकिंग-व्यवहार करणे सुरु ठेवू शकते. परिस्थितीवर अवलंबून वरील निदेशात बदल करण्याचा विचारही रिझर्व बँक करु शकते.

**अजित प्रसाद**

सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/2427**